26 NOV 2022
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांची मतदान नोंदणी आवश्यक

## मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर, ता. २५ :** तरुणांनी मतदान आणि मतदान नोंदणी केली पाहिजे. त्यासाठी ज्या तरुणांची मतदार यादीत नोंदणी झालेली नाही, अशा महाविद्यालयीन तरुणांना महाविद्यालयात प्रवेश अर्जाबरोबरच मतदार नोंदणीचा अर्ज देण्याबाबत विचार सुरू आहे. दरम्यान, मतदार जनजागृतीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे उद्या (ता. २६) संविधान दिनाचे औचित्य साधून 'जगण्यातलं संविधान'वर परिसंवाद होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात सकाळी दहापासून परिसंवाद सुर होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते.

देशपांडे म्हणाले, "मतदार नोंदणीसाठी महाविद्यालयात मोहीम राबवली जाईल. प्रवेश घेतानाच मतदार नोंदणीही करून घेण्याचा विचार सुरू आहे. ज्या विद्यार्थ्यांनी मतदार नोंदणी केली आहे. त्यांचा मतदान क्रमांक आणि नोंदणी झाली नाही त्यांच्यासाठी वेगळा कॉलम देऊन नोंदणीही करता येईल. तरुणांनी मतदानासाठी पुढाकार घेतला पाहिजे. याचाच भाग म्हणून परिसंवाद होईल. यामध्ये, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या मुक्ता दाभोलकर, सॅबी परेरा, कीर्तनकार सचिन पवार, प्राध्यापक राहुल सरवटे, प्रा. गायत्री लेले मार्गदर्शन करतील." या वेळी डॉ. दीपक पवार यांनी संपादित केलेल्याया पुस्तकाचे प्रकाशन तारा भवाळकर यांच्या हस्ते होईल.

26 NOV 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मतदार जनजागृतीसाठी आज परिसंवाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

मतदार जनजागृतीसाठी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'जगण्यातलं संविधान' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे व शिवाजी विद्यापीठाचे प्र-



कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. मतदार नोंदणीसाठी महाविद्यालयीन विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून काम सुरु आहे, असेही देशपांडे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. देशपांडे म्हणाले, परिसंवादामध्ये

- **मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे**
- **मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन**

अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या मुक्ता दाभोलकर, स्तंभलेखक सॅबी परेरा, किर्तनकार सचिन पवार, प्रा. राहुल सरवदे, प्रा. गायत्री लेले, श्रीकांत देशपांडे आदी सहभागी होणार आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे डॉ. दीपक पवार हे संवादक आहेत. यावेळी डॉ. दीपक पवार संपादित 'कशासाठी लिंगभाव समतेसाठी' या पुस्तकाचे प्रकाशन लोकसाहित्य अभ्यासक तारा भवाळकर यांच्या हस्ते होणार आहे.

संविधान दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी मतदार नोंदणी दालन उभारण्यात येणार आहे. त्याचबरोबर निवडणूक व लोकशाही साक्षरतेसाठी ल्युडो, सापशिडीचे आयोजने केले आहे.

लोकमत

# नव्वद टक्के तरुणाई मतदार नोंदणीपासून दूरच : देशपांडे

## नोंदणी केली तरच महाविद्यालयीन प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तरुणाईने मतदानाचा अधिकार बजावावा, यासाठी निवडणूक कार्यालयाकडून उपक्रम राबविले जात असले, तरी अजूनही १८ ते २२ वयोगटातील ९० टक्क्यांहून अधिक युवकांनी मतदान ओळखपत्र काढलेले नाही. नवमतदार वाढवायचे असतील तर महाविद्यालयांमध्ये बारावीनंतरची प्रवेश प्रक्रिया केली जाईल, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मतदान ओळखपत्राच्या कागदपत्रांची पूर्तता आणि नोंदणी करण्याचा पर्याय आम्ही राज्य शासनाला सुचविला आहे. यावर लवकरच कार्यवाही होण्याची अपेक्षा आहे, असेही त्यांनी सांगितले.

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या वतीने आज, शनिवारी शिवाजी विद्यापीठातील शाहू सभागृहात सकाळी १० वाजता 'जगण्यातलं संविधान' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंबंधी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

जिल्हाधिकारी राहुल रेखावार, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे डॉ. दीपक पवार, आदी उपस्थित होते.

### वंचित घटकांसाठी या प्रवाहात आणणार

देशपांडे म्हणाले, पुढील काळात या धोरणावर अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले जातील. तृतीयपंथी, दिव्यांग, सेक्स वर्कर, आदिवासी विभागातील तसेच कायम भटकंतीवर असलेले मजूर, अशा वंचित घटकांना या प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या कागदपत्रांच्या अटीत शिथिलता आणून नोंदणीसाठी प्रयत्न केले जात आहेत.

देशपांडे म्हणाले की, नागरिकांमध्ये विशेषत: युवा पिढीत मतदानाबद्दल जागरूकता यावी, त्यांनी मतदार नोंदणी करून ओळखपत्र काढावे, यासाठी विभागाच्या वतीने सर्व विद्यापीठांमध्ये, महाविद्यालयांमध्ये मतदार जागृती कार्यक्रम घेण्याचे, विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी मदत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रियेच्या कागदपत्रांची पूर्तता करतानाच मतदार नोंदणीची प्रक्रिया पार पाडली तर सर्व नवमतदारांची सहज नोंदणी होणार आहे. याबाबत वरिष्ठ स्तरावर चर्चा झाली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी मतदार जागृतीसाठी विद्यापीठाकडून घेतल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. ७० महाविद्यालयांत निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन झाल्याचे सांगितले.

पुढारी

# जिल्ह्यात मधमाशी मित्रांची तुकडी तयार : जिल्हाधिकारी रेखावार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मधमाश्यांना हानी न पोहोचवता पर्यावरणपूरक पद्धतीने मधाचे पोळे काढण्यासाठी पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात २५ मधमाशी मित्रांची तुकडी तयार झाली आहे, ही अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्गार काढून मधमाशी मित्र तयार करण्यासाठीची ही कार्यशाळा देशातील अभिनव उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केले.

प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी रेखावार यांच्या हस्ते मधमाशी मित्र प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, संगणकशास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. कविता ओझा व अधिकारी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कबड्डी पुरुष संघाला प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रभारी कुलसचिव व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाचा कबड्डी पुरुष संघ जाहीर

कोल्हापूर, ता. २५ : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी पुरुष स्पर्धा राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर, मध्य प्रदेश येथे होत आहेत. या स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा १२ खेळाडूंचा संघ जाहीर करण्यात आला. प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांनी संघाला मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. सदर संघात संजित बाबूराव पाटील, पृथ्वीराज सागर चव्हाण, साईप्रसाद तुकाराम पाटील, स्वराज दिलीप साळवी, निखिल कृष्णात जाधव, ओंकार पांडुरंग इंजल, शुभम माणिक पाटील, जमीर नजीरब शेख, सौरभ शिवाजी चौगुले, किरण भगवान गोसावी, अमन रफिक भिसुरे, तानाजी सिदाम पवार आदी खेळाडू आहेत. संघाबरोबर प्रशिक्षक म्हणून डॉ. रमेश भेंडेगिरी आणि संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. संजय रामचंद्र पाटील आहेत. संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व संचालक क्रीडा अधिविभाग प्रा. डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले.